# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

**प्रसिद्धी पत्रक** **ता. ९ एप्रिल २०१९**

# मनपा शाळेत पर्यावरणावर कार्यशाळा

## मनपा-ग्रीन व्हिजील-अर्थ डे नेटवर्कचे आयोजन

**नागपूर,ता. ९ :** नागपूर महानगरपालिका, ग्रीन व्हिजील फाऊंडेशन आणि अर्थ डे नेटवर्क इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने मनपाच्या लाल बहादुर शास्त्री हिंदी माध्यमिक शाळेत पर्यावरण संरक्षणावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यशाळा अर्थ डे नेटवर्कची यावर्षीची थीम ‘प्रोटेक्ट अवर स्पेसीस’ (Protect Our Species) यावर आधारीत होती. याअंतर्गत ग्लोबल वॉर्मिंग, जलवायू परिवर्तन, नैसर्गिक संपदेचे संरक्षण, प्लास्टिक प्रदूषणावर प्रतिबंध, वायू प्रदूषण, जल प्रदूषण, झाडांची रोडावणारी संख्या आदी पर्यावरण संरक्षणासंदर्भातील विविध पैलूंवर ग्रीन व्हिजीलच्या स्वयंसेवकांनी प्रकाश टाकला. याच विषयावर चर्चा, वादविवाद स्पर्धा आणि पथनाट्याचे

आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.

यावेळी लाल बहादूर शास्त्री हिंदी माध्यमिक शाळेचे संजय पुंड, विलास बालमवार, ग्रीन व्हिजील पर्यावरण संस्थेचे संस्थापक कौस्तभ चॅटर्जी, सुरभी जैस्वाल, मेहुल कोसुरकर, कल्याणी वैद्य, विकास यादव उपस्थित होते. प्रास्ताविक मधुलिका तिवारी यांनी केले. आभार संध्या डांगे यांनी मानले.